प्रकरण तिसरे

# सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक समाजाचे कार्य

प्रकरण तिसरे

# सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक समाजाचे कार्य

महाराष्ट्रात बहुजन समाजाला विशेषतः ग्रामीण जनतेला प्रथम जागे करण्याचे श्रेय महात्मा जोतीराव फुले यांना व त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाला जाते. म. फुले यांनी सामाजिक समतेबरोबरच धार्मिक समतेचाही पुरस्कार केला. जातीव्यवस्थेवर प्रहार करणारे आधुनिक भारतातील ते पहिले बंडखोर होत. २४ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

शेतकरी वर्ग दरिद्री आहे. त्याच्या उध्दारासाठी, धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी, बहुजन समाजातील अज्ञान, धर्मभोळेपणा, रूढीप्रियता नष्ट करण्यासाठी, त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी, बहुजन समाजात जागृती करण्यासाठी, समाजातील उच्चनीचता नष्ट करून सामाजिक समता निर्माण करण्यासाठी, बहुजन समाजातील अंध्दश्रध्दा, रूढी, परंपरा, देवभोळेपणा नष्ट करणेसाठी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

म. फुले यांचा १८९० मध्ये मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर सावित्रीबाई, नारायणराव लोखंडे इ. सत्यशोधकांनी समाजाचे काम चालविले. म. फुलेंच्या तत्वावर निष्ठा असणाऱ्या राजर्षी शाहू महाराजापासून ना. भास्करराव जाधव, कर्मवीर भाऊराव पाटील, भाई माधवराव बागल, जेधे, जवळकर, भाऊसाहेब पंजाबराव देशमुख, दलितमित्र पंढरीनाथ पाटील, कै. केशवराव विचारे अशा थोर सत्यशोधकांची एक तेजस्वी परंपरा महाराष्ट्रात निर्माण झाली. इ. स. १९११ मध्ये शाहू महाराजांनी या चळवळीचे पुनरूज्जीवन घडवून आणले. वेदोक्त प्रकरणामुळे खुद्द छत्रपतींना शुद्र लेखले गेले.

त्यामुळे छ. शाहू महाराजांच्या हे लक्षात आले की, राजालाच जर हे भटभिक्षुक एवढे तुच्छ लेखतात व त्रास देतात तर खेड्यापाड्यातील अडाणी प्रजेला, शुद्रांना किती तुच्छ लेखले जात असेल व त्यांना किती त्रास होत असेल. या जाणीवेतून व म. फुले यांचे राहिलेले कार्य पुढे चालविण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी भास्करराव जाधव, आण्णासाहेब लठ्ठे, म. ग. डोंगरे इ. तरूणांना हाताशी धरून सत्यशोधक समाजाचे कार्य सुरु केले.[१]

'कोल्हापूर शाहू सत्यशोधक समाज' १९११ मध्ये भास्करराव जाधवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाला. त्यानंतर त्यांच्याच मार्गदर्शनाने धार्मिक विधीसाठी 'घरचा पुरोहित' हे पुस्तक व लग्नविधीसाठी काही पत्रके तयार करण्यात आली. लग्नविधी व धार्मिक विधी ब्राह्मणाशिवाय करण्याची चळवळ सुरु झाली. २४ सप्टेंबर १९१२ या दिवशी म. फुले यांनी स्थापिलेला सत्यशोधक समाजाचा वाढदिवस जाहीर सभा भरवून साजरा करण्यात आला.[२]

१९१७ ते २० या तीन वर्षाच्या काळात पुणे, सातारा, सोलापूर या ठिकाणीही सत्यशोधक समाजाचा प्रसार झाला.[३] याचकाळात केशवराव विचारे यांचा राजर्षी शाहू महाराज व श्री. भास्करराव जाधव यांच्याशी जवळचा सबंध आला व ते सत्यशोधक समाजाकडे आकर्षित झाले. १९१९ मध्ये स्टेशन मास्तरच्या नोकरीचा केशवराव विचारे यांनी राजीनामा दिला व सत्यशोधक समाजाचे कार्य करण्याचे ठरविले. सातारा जिल्ह्यात कर्मवीर भाऊराव पाटील, केशवराव विचारे, शंकर आबाजी बोगर, रघुनाथराव राणे वकील, ए. बी. आचरेकर, रामभाऊ नलावडे वकील, रामचंद्र शिंदे वकील, वाईचे रामचंद्र ना. चव्हाण, केंजळचे मानसिंग जगताप इ. मंडळी सत्यशोधक चळवळीचे कार्य करीत होती. १९१९ नंतर केशवराव विचारे यांनी सत्यशोधक चळवळीच्या कार्यास सुरुवात केली. कोरेगाव, सातारा, खटाव, वाई, कराड इ. तालुक्याच्या परिसरात त्यांनी या चळवळीचा प्रसार केला.[४]

## सत्यशोधक समाजाचे शैक्षणिक कार्य

प्राचीन काळापासून शिक्षणाची मक्तेदारी ठराविक वर्गाकडे होती. बहुजन समाज शिकला पाहिजे, शिकून शहाणा झाला पाहिजे, शिक्षण खेड्यापर्यंत पोहचले पाहिजे, मागासलेल्या वर्गातील निरनिराळ्या जातीतील सर्व लोकाना शिक्षण मिळाले पाहिजे, असा विचार पुढे आला. २५ सप्टेंबर १९१९ रोजी सत्यशोधक समाजाची परिषद काले ता. कराड जि. सातारा येथे पुणे येथील सत्यशोधक समाजाचे पुढारी केशवराव बागडे वकील यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. या परिषदेला सत्यशोधक समाजाची जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरची प्रमुख मंडळी हजर होती. या परिषदेला प्रमुख कार्यकर्ते म्हणून भाऊराव पाटील हे हजर होते. शिक्षणाचे महत्व ओळखून भाऊराव पाटलांनी परिषदेत सर्वांना आवाहन केले -

''आपण सर्व कार्यकर्ते सत्यशोधक समाजाचे विचार सभा, परिषदा, तमाशे, जलसे या द्वारे जनतेपुढे प्रभावीपणे मांडतो. परंतु आपल्या विचाराप्रमाणे जनतेमध्ये सुधारणा होत असल्याचे आढळून येत नाही. तेव्हा शिक्षणप्रसाराशिवाय याला परिणामकारक तोडगा मलातरी दिसत नाही म्हणून उपेक्षित व बहुजन समाजाच्या मुला-मुलीना शिक्षण देण्याकरिता एक शिक्षण संस्था स्थापन करणे आवश्यक आहे.'' भाऊरावांचे विचार सर्वांना पसंत पडले आणि याप्रमाणे परिषदेत ठराव झाला. संस्थेच्या नावाची चर्चा होऊन 'रयत शिक्षण संस्था' असे नाव देण्याचे ठरले.[५]

दाजी पाटील, नारूकाका खोत, भाऊराव तौगुले, खटावकर आदी या गावातील स्थानिक मंडळीच्या साहाय्याने भाऊरावांनी काले येथेच वसतिगृह सुरु करून शिक्षण संस्थेच्या कार्यास सुरुवात केली. नंतर तेथेच मराठी शाळा सुरु करून संस्थेसाठी प्रवेश अर्ज, नियमावली इ. छापून घेतले. भाऊराव हे किर्लोस्कर कारखान्यात विक्रेते म्हणून काम करीत होते. ते काले येथे येऊन संस्थेचा कारभार पाहू लागले.

<u>संस्थेचे उद्देश</u>

१) मागासलेल्या वर्गात शिक्षणाची आवड निर्माण करणे.

२) मागासलेल्या जातीतील अत्यंत गरीब विद्‌यार्थ्यास मोफत शिक्षण देण्याचा प्रयत्न करणे.

३) सामान्य स्थितीतील विद्‌यार्थ्यास त्यांच्या खर्चाने किंवा फारतर निम्या खर्चाने संस्थेत शिक्षण घेण्याकरिता ठेवणे.

४) परगावच्या विद्‌यार्थ्यांची संस्थेत सोय करणे.

५) मागासलेल्या वर्गातील निरनिराळ्या जातीतील विद्‌यार्थ्यामध्ये प्रेमभाव उत्पन्न करणे.

६) जुन्या रुढी, परंपरा, अंधश्रद्‌धेस फाटा देऊन खऱ्या मार्गाचा अवलंब करण्यास शिकविणे.

७) एकीचे महत्व विद्‌यार्थ्यास पटविणे.

८) मुले काटकसरी, नियमित, स्वावलंबी, उदयोगी, उत्साही व शीलवान बनविण्याचा प्रयत्न करणे.

९) संस्थेचे शिक्षणाच्या बाबतीत कार्यक्षेत्र वाढविणे.[६]

या उद्देशाने सत्यशोधक समाजाच्या प्रेरणेने रयतचा पुढे प्रचंड विस्तार झाला.

नेर्ले येथे रयत शिक्षण संस्थेच्या बोर्डिंग अनावरण विधीचे वेळी अध्यक्ष या नात्याने मे. कलेक्टरसाहेब बहादूर म्हणाले, ‘‘भाऊराव पाटील हे नमुनेदार ‘सत्यसामाजिस्ट’ आहेत. सत्य प्रसारासाठी ते प्रयत्न करीत आहे. सत्यसमाजाची चळवळ सत्याची आहे. जुलूम जबरीने सत्याचा प्रसार होणार नाही. लोकांना धार्मिक गुलामगिरीतून सोडविण्याकरितां सत्यसमाज धडपड करीत आहे. काही त्रास व उपद्रव झाला की, तो समाजीस्टांनी केला असा कांगावा ब्राह्मण हल्ली करूं लागले आहेत. जणू सत्यशोधक समाज चळवळीची उत्पत्ति होण्यापूर्वी ह्या प्रकारचे उपद्रव त्यांना होतच नव्हते.’’[७]

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याप्रमाणेच श्री बाबूराव जगताप यांची ‘श्री शिवाजी मराठा

शिक्षण संस्था', श्री. पंजाबराव देशमुख यांचे 'श्री शिवाजी लोक-विद्यापीठ', बॅरिस्टर खर्डेकर - एम. आर. देसाई यांच्या नेतृत्वाखालचे कोल्हापूरचे शिक्षण प्रसारक मंडळ तसेच श्री. जयवंतराव बाबूराव जगताप यांची 'जनता शिक्षण संस्था' इ. संस्था स्थापन होऊन महाराष्ट्रामध्ये बहुजनांच्या शिक्षणाचे जोरदार प्रयत्न सुरु झाले. यामागे सत्यशोधक विचारांची प्रेरणा होती.[८]

म. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीला ज्या समाज सेवकांनी वाहून घेतले व त्यासाठी आपले जीवन समर्पित केले त्यात केशवराव विचारे हे एक होते. केशवरावांचे जन्मगाव गुहागर तालुक्यातील आडूर हे होते.[९] परंतु त्यांची कर्मभूमी सातारा जिल्हा झाली. केशवराव विचारे यांनी ग्रामीण परिसरामध्ये शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तन घडविण्याची इच्छा बाळगून प्रौढ शिक्षणाची मोहीम सर्वत्र राबविली. विचारे यांनी सातारा जिल्हयातील सातारारोड येथे काही काळ नोकरी केल्याने सातारा जिल्हयातील अनेक कार्यकर्त्यांशी त्यांची ओळख व जवळीक निर्माण झाली. नोकरीचा राजीनामा दिल्यानंतर त्यांनी सातारा जिल्हयातच सत्यशोधक चळवळीच्या कार्याला वाहून घेतले. त्यांनी सत्यशोधक समाजासाठी एक नवा कार्यक्रम दिला. बहुजन समाज स्वकीयांच्या दास्यातून मुक्त करणे, अंधश्रध्दा व मागासलेपणा नष्ट करणे, धर्मभोळेपणा नाहीसा करणे या दृष्टीने त्यांनी आपला कार्यक्रम आखला.

सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्याला चालू राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे ज्ञान असले पाहिजे, तसेच तो वक्ता झाला पाहिजे, कष्टकरी गरीबामध्ये 'आपली उन्नती आपल्या हाती' ही जाणीव निर्माण करून त्यांचा आत्मविश्वास वाढविला पाहिजे या उद्देशांनी विचारे यांनी कॉरस्पॉन्डस विद्यार्थी संघ, पोस्टल क्लासेस, सत्यशोधक विद्यार्थीसंघ इ. उपक्रम राबविले.[१०] केशवराव विचारे यांच्यामुळे सातारा जिल्हा सत्यशोधक चळवळीत आघाडीवर होता. या जिल्हयातील कोरेगाव तालुक्यातील पाडळी (सातारा रोड) हे गाव या चळवळीचे काही काळ केंद्र होते.

<u>कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघ</u>

अनेक वर्षे सत्यशोधक चळवळीत काम केल्यानंतर केशवराव विचारे यांना असे आढळून आले की, बहुजन समाजात निरक्षर लोकांचे प्रमाण तर भरपूर आहेच परंतु जे थोडे लोक साक्षर आहेत ते सुद्धा आपल्या शिक्षणाचा उपयोग करू शकत नाहीत. एकदा शिक्षण झाले की ते लिहिण्या-वाचण्याकडे अजिबात लक्ष देत नाहीत. परिणामतः आजूबाजूच्या परिस्थितीचे यथायोग्य ज्ञान त्यांना मिळत नाही. अशा परिस्थितीत बहुजन समाजातील प्रौढ साक्षर व्यक्तींना धर्म, नीति, राजकीय इतिहास इ. विषयांची माहिती पुरविल्यास त्यांच्यात ज्ञानाबद्दल आवड निर्माण होईल म्हणून त्यांनी प्रौढ शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने इ. स. १९३३ मध्ये कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघाची स्थापना केली. या संघाचे मुख्य कार्यालय सातारारोड या ठिकाणी होते.[११]

<u>संघाचा हेतू</u>

स्वार्थी राजकारण करणाऱ्या लोकाकडून बहुजन समाजातील सामान्य लोक फसविले जाऊ नयेत म्हणून त्यांच्यात जागृती निर्माण करणे, आर्थिक प्रगतीसाठी सहकाराचे महत्व पटविणे, विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनण्यास समर्थ करणे आदी संघाचे अनेक हेतू होते.[१२]

<u>संघाचे स्वरूप</u>

केशवराव विचारे यांनी अनेक विषयांची माहिती मिळवून कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघाचा अभ्यासक्रम तयार केला. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना संघाचे सेक्रेटरी घरपोच करीत. विद्यार्थ्यांमध्ये शाळा सोडून दिलेल्या व इतर उद्योगधंदे निर्माण करणाऱ्या प्रौढ स्त्री-पुरुषांचा समावेश असे. घरी बसून या अभ्यासक्रमाचा अभ्यास करता येत असे. या अभ्यासक्रमात सहभागी होणारे विद्यार्थी व ही योजना चालविणाऱ्या यंत्रणेला मिळून कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघ म्हणत.[१३] या विद्यार्थी संघात

शेतकरी, मजूर, स्थानिक संस्थेतील नोकरवर्ग अशा विविध व्यवसाय करणाऱ्या लोकांनी सभासदत्व स्विकारले होते.

### अभ्यासक्रम

कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघात धर्म, नीति, राजकीय इतिहास आणि अर्थशास्त्र या विषयाची माहिती पुरविली जात असे. तसेच मासिके, वर्तमानपत्रे घरपोच केली जात असत.[१४]

### कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघाचे कार्य

केशवराव विचारे यांना या कार्यात लोकांच्याकडून काही प्रमाणात प्रतिसाद मिळाला. त्यांनी विद्यार्थ्यांचे अनेक संघ (ग्रुप्स) तयार केले व त्या संघाना अनेक उपयुक्त पुस्तके व वेगवेगळ्या विषयांवरील माहिती अभ्यासासाठी पुरविली.

समाजातील तंटे-बखेडे, भांडणे, त्याच्यातील अंधश्रध्दा इ. गोष्टी अभ्यासाच्या अभावामुळे होतात याची जाणीव त्यांनी बहुजन समाजाला करून दिली. ज्ञान हे सतत अभ्यासूवृत्ती असल्याशिवाय प्राप्त होत नाही हे त्यांनी पटवून दिले. विचारे यांनी कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघामार्फत बहुजन समाजात जागृती घडवून आणून त्यांच्यात ज्ञानाविषयी आवड निर्माण करण्याचे कार्य केले. कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघात विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे म्हणून विचारे यांनी प्रचारपत्रक काढले होते त्यात ते म्हणतात - ''भविष्यकाळातील सुखे वर्तमानकाळी आपण जे ज्ञान वाढवाल त्यांवरच अवलंबून राहणार म्हणून तुम्ही आजच कॉस्पॉन्डन्स संघात सामील व्हा. तुम्हाला घरच्या घरीच कोणत्याही उद्योगात व्यत्यय न आणता निरनिराळ्या विषयांचे ज्ञान वाढविण्याची ही अमोल संधी आहे.''[१५]

ज्ञानाच्या प्रसारासाठी कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघाने नवीन वाचनालये सुरू केली. संघातर्फे वादविवाद मंडळे चालविली.

## पोस्टल क्लासेस

ग्रामीण भागातील लोकांना सहकार, सहकाराची उद्दिष्टे, महत्व पटावे, सहकार चळवळीचा प्रसार व्हावा, सहकार चळवळीविषयीचे ज्ञान त्यांना मिळावे म्हणून पोस्टल क्लास सुरू केले. ग्रामीण भागातील लोकांना सहकाराचे शिक्षण देण्यासाठी मुंबई येथे - ''दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट'' ची स्थापना करण्यात आली. या इन्स्टिट्यूटच्या शाखा जिल्हानिहाय सुरू करण्यात आल्या.[१६] सातारा जिल्हयामध्ये या इन्स्टिट्यूटच्या जिल्हा शाखेचे प्रमुख केंद्र इस्लामपूर येथे होते व केशवराव विचारे या शाखेचे अध्यक्ष होते. पोष्टाने अभ्यासक्रम पाठवून क्लासेस सुरू करण्याच्या या योजनेलाच पोस्टल क्लासेस असे म्हणतात. म्हणजेच पत्राद्वारे लोकशिक्षण होय. या पोस्टल क्लासच्या विद्यार्थ्यांसाठी नियम तयार करण्यात आले होते.

सहकारी चळवळीच्या वाढीला प्रोत्साहन देणे, स्वावलंबन, समता, बंधुभाव, परस्पर साहाय्य, काटकसर, सर्व समाजात जागृती करणे, दारिद्र्य नष्ट करणे. हे पोस्टल क्लासचे उद्देश होते.[१७]

अशाप्रकारे विचारे गुरुजींनी पत्राद्वारे लोकांना शिक्षण देण्यासाठी अनेक कार्यकर्ते तयार केले. हे कार्यकर्ते नेमून दिलेल्या गावी जाऊन अभ्यास करणाऱ्या मंडळींना अभ्यासाचे महत्व पटवून देत व लोकांना पोस्टल क्लास सुरू करण्यासाठी प्रोत्साहित करीत.

## सत्यशोधक विद्यार्थी संघ

सन १९३९ मध्ये केशवराव विचारे यांनी सत्यशोधक विद्यार्थी संघाची स्थापना केली. पत्रव्यवहारातून अभ्यासक्रम वर्ग चालविण्यापेक्षा माणसेच संघटीत करून त्यांना आपले विचार पटवून दयावेत व त्यातून तयार झालेल्या कार्यकर्त्यांना गावोगाव पाठवून त्यांच्याकडून लोकशिक्षणाचे कार्य करावे त्यामुळे कामाला वेग येईल हा विद्यार्थी संघ स्थापन करण्यापाठीमागे उद्देश होता. सत्यशोधक विद्यार्थी संघाची घटना तयार करण्यात आली होती संघाच्या सभासदांना प्रतिज्ञा पत्रक

भरून दयावे लागे. त्यामध्ये समता, बंधुता आणि सहकारीता या तत्वांच्या आधारे स्वतः आचरण करून शेतकरी कामगार वर्गात रोज दोन तास याप्रमाणे विचार जागृतीचे काम करीत. तसेच संस्थेच्या घटना व नियमाप्रमाणे वागण्यास मी तयार आहे याची आणि गावचा पत्ता, वय, शिक्षण, धंदा इ. ची माहिती असे.[१८]

**अभ्यासक्रम**

केशवराव विचारे यांनी पुढीलप्रमाणे विद्‌यार्थी संघाचा अभ्यासक्रम तयार केला.

१. आपण कोठे आहोत ?

२. अन्न

३. युध्द

४. मन

५. भिन्न विचार प्रणाली

६. शिक्षण

७. धर्म

८. नीति

९. विवाहसंस्था

१०. देव

११. भक्ती

१२. राजकारण

१३. अर्थशास्त्र

१४. सहकार्य

१५. संघटना

१६. सत्यशोधक म. जो. फुले

१७. मुत्सद्याची नीति

१८. सध्याचे सत्यशोधक[१९]

वरील अभ्यासक्रमातून विचारे गुरुजीं खेड्यातील गरीब लोकांना म. फुलेंचे तत्वज्ञान साध्या व सोप्या भाषेत समजावून देत. खेडोपाडी शिबीरे घेऊन वरील विषयावर ते स्वतः व्याख्याने देत. अशाप्रकारे लोकशिक्षणाच्या कार्याला सत्यशोधक विद्यार्थी संघातर्फे विचारे गुरुजींनी सुरुवात केली.

विचारे गुरुजींनी पाडळी, भक्तवाडी, तडवळे, वाघोली येथे रात्र शाळा सुरू केल्या. गुरुजी स्वतः शिकवायला जात असत. सुरुवातीस ग, म, भ, न व नंतर स्त्री-पुरुष समानता, स्वच्छता इ. विषयांची माहिती ते देत.[२०] सत्यशोधक विद्यार्थी संघामार्फत लोकरंजनातून लोकशिक्षणाचे आकर्षक कार्यक्रम केले जात व त्यातून समाजप्रबोधन केले जाई उदा. - चित्तवेधक नाटिका, स्फूर्तीदायक पोवाडे, बोधप्रद लोकगीते, सांस्कृतिक जलसा, नकला, विचारप्रर्वतक व्याख्याने, संताचा बहुमोल संदेश देणारे कीर्तन, कसरतपटुंचे प्रेक्षणीय प्रयोग इ. कार्यक्रमातून सत्यशोधक विद्यार्थी संघ समाजप्रबोधन करीत असे.[२१]

विचारे गुरुजींनी या सत्यशोधक संघामार्फत संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला. सामाजिक व धार्मिक क्षेत्रात विचार परिवर्तन घडवून आणले. त्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबविले ते पुढीलप्रमाणे बौध्दिक शिबीरे - केशवराव विचारे यांनी १९३९ मध्ये सातारारोड येथे एक महिन्याचा अभ्यास वर्ग घेतला. या अभ्यासवर्गामध्ये राजारामबापू फाळके (सातारारोड), आण्णासाहेब मोरे, सर्जेराव जाधव (भक्तवडी), सोनबा ढमाळ (असवली), दत्ताजीराव जाधव (भक्तवडी), जोत्याजीराव फाळके (सातारारोड) इत्यादी लोक या अभ्यासवर्गात सहभागी झाले होते. या अभ्यास वर्गाचा समारोप

धनजीशा कूपर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या अभ्यासवर्गामध्ये मन, धर्म, सहकार, नीती, शिक्षण हा विद्यार्थीसंघाचा अभ्यासक्रम तर विद्यार्थ्यांना शिकविलाच शिवाय सभाधीटपणा, प्रासंगिक बोलण्याची कला, आपले मुद्दे व म्हणणे व्यवस्थित पटवून देण्याचे कसब तेथे शिकविले. त्यामुळे फारशी शैक्षणिक पात्रता नसतानादेखील या वर्गातून बाहेर पडणारे विद्यार्थी व्यासपीठ गाजवू लागले.[२२] शिबीरात तयार झालेले कार्यकर्ते स्वतः शिबीरे घेऊन लोकशिक्षणाचे काम करू लागले. त्यांनी समाजातील अनिष्ट चालीरिती, रूढी, परंपरा, अंधश्रध्दा याविरूद्ध आवाज उठविला. तसेच बुद्धीप्रामाण्यवाद महत्वाचा मानून त्यानुसार लोकांनी वागावे असे जाहीर व्याख्यानातून सांगितले. सत्यशोधक विद्यार्थी संघाचे महत्वाचे कार्य म्हणजे त्यांनी बहुजन समाजात सहकार रूजविण्याचा प्रयत्न केला. या विद्यार्थी संघातून निर्माण झालेल्या कार्यकर्त्यांनी सत्यशोधक चळवळीचा प्रसार जोमाने खेडोपाडी केला.

## सामाजिक कार्य

सत्यशोधक जलसे - समाजामध्ये असणाऱ्या जातीभेद, अंधश्रध्दा, देवादिकांचे फाजिल स्तोम या विरूद्ध आवाज उठविण्यासाठी जलशाचा उपयोग सत्यशोधकांनी केला. शेकडो पुस्तकांनी व व्याख्यानांनी मतप्रचाराचे जे काम होणार नाही ते त्या काळात जलशांनी केले. खेड्यापाड्यात विखुरलेल्या दीनदुबळ्या व गरीब लोकांना म. फुलेंच्या सत्यशोधक समाजाचे तत्वज्ञान साध्या व सोप्या भाषेत पटवून देण्यासाठी पाडळी येथील ज्योत्याजीराव फाळके व इतर काही मंडळीच्या सहकार्याने केशवराव विचारे यांनी जलशाची स्थापना केली. ग्रामीण परिसरात जलशांचे कार्यक्रम करून त्यातून जुन्या रूढी व अंधश्रध्दा, वर्णवर्चस्व, वाईट चालीरीती, धर्मभोळेपणा या विरूद्ध आवाज उठविला.[२३] जलशामध्ये मनोरंजन असले तरी त्यामधून सामान्य जनतेला त्यांच्या चुकांची जाणीव करून दिली. व्रतवैकल्य, मूर्तीपूजा, सोवळेओवळे व ब्राम्हण यांचे स्तोम माजविणाऱ्या

14424

भोंदूवर यामधून कडाडून टीका केली. मनोरंजनातून लोकशिक्षण हाच जलशाचा पाया होता. या कार्यक्रमाची मूळ बैठक माणूस हा जन्माने श्रेष्ठ नसून तो कृतीने व ज्ञानाने मोठा होऊ शकतो या समाजवादी विचारावर आधारीत होती.[२४]

सामान्य तमाशाप्रमाणे हलगी, ढोलची, तुणतुणे, ताशा, डफ इ. वादये सत्यशोधक जलशांनी मुद्दाम उचलली कारण ही महाराष्ट्रीयन जनतेची प्यारी वाद्ये आहेत. लोकांना आपल्याकडे आकर्षून घेण्यासाठी जलशेवाल्यांनी या वाद्यांचा उपयोग केला. सत्यशोधकांना लोकांच्या मनोरंजनासाठी जलसे करावयाचे नव्हते. त्यांना जलशाचा उपयोग लोकजागृतीसाठी करावयाचा होता. म्हणून त्यांनी आपली तत्वे लोकांपुढे मांडण्यासाठी लोकांच्या आवडीचे असे हे जलशांचे साधन जवळ केले. जलशाच्या निमित्ताने लोकांना जवळ बोलवायचे व त्यांना त्यांची स्थिती पटवून दयायची या हेतूने पोवाडे, लावण्या, पद्ये वगैरे रचली. लावणीची चाल सरळ, भाषा सुबोध, सोपी वगैरे गोष्टी लक्षात घेऊन सत्यशोधकांनी लावणी छंद आत्मसात केला. सत्यशोधक कवींनी लावण्या, पोवाडे, अभंग वगैरे रचले. शेतकऱ्यांची सद्य स्थिती, शेटजी व भटजी यांचा जुलूम, सामाजिक विषमता, जातीभेदाचा दुष्परिणाम या विषयावर काव्य निर्माण केले. सद्य स्थितीत जीवनकलहाच्या टकरीतून निभावून निघायचे असेल तर विद्येशिवाय गति नाही हे जाणून विद्येची महती गाणारी पद्ये रचली. शेतकरी वर्गाच्या भोळेपणाचा, अज्ञानाचा धर्मवेडा भटजी वर्ग कसा फायदा घेतो. देवभोळेपणा, ग्रहपीडा, अंधश्रध्दा इत्यादी बाबतीत भोळा शेतकरी कसा नागवला जातो हे त्यांनी या कवनातून सांगीतले.

सत्यशोधक जलशांना इतर जलशाप्रमाणे गणाने सुरूवात होते. भिमराव महामुनींचा एक गण पुढीलप्रमाणे -

नमो अधितुशि भगवंता।

चरणी ठेवि तुमच्या माथा ।।ध्रृ.।।

दीन दयाळा पुरवी लळा।

दूर करी मम चिंता रे ।।१।।

जगचालका मज बालका।

धरी ह्रदयी दोन्ही हस्तीरे ।।२।।

महामुनी, लोळे चरणी।

संकटसमयी धाव आतारे ।।३।।

हिंन्दु संस्कृतीत गणपतीला नमस्कार करून कार्याला सुरूवात करण्याची परंपरा फार जुनी आहे. सत्यशोधकांनी या परंपरेला थोडे वेगळे वळण दिले आहे. वरील गणावरून एक गोष्ट लक्षात येते की यात एकेश्वरवाद दिसून येईल. सत्यशोधक अनेक देवता मानीत नाहीत. त्यालाच अनुसरून गण गाईला आहे.

सत्यशोधक जलशाचे पाच सहा गट वेगवेगळ्या जिल्ह्यातून गावोगाव कार्यक्रम करीत फिरत असत. पुरुषच स्त्रियांची कामे करीत. सातारा, पुणे, कोल्हापूर, धुळे, खानदेश, विदर्भ या भागात हे कार्यक्रम खूप गाजले. या जलशामध्ये जोत्याजीराव फाळके, जिजाबा लक्ष्मण फाळके, भिकोबा ग्यानबा फाळके, सोनोपंत दांडेकर, आबा साबळे, परबती साबळे, महादू पाटील, नारोपंत क्षीरसागर, रामचंद्र घाटगे, बाबूराव यादव, शाहीर बाबुराव भोईटे, कर्मवीर भाऊराव पाटील, शाहीर पुंडलीक फरांदे इ. मंडळी काम करीत. १९२५ ते १९३५ या दहा वर्षाच्या कालावधीमध्ये सारा ग्रामीण परिसर एका वेगळ्या सामाजिक प्रबोधनासाठी ढवळून काढण्याचे काम या जलशांनी बजावले.[२५]

<u>जलशांचे स्वरूप</u>

जलशात बहुजन समाजातील कार्यकर्ते होते. सत्यशोधक समाजाची तत्वे खेड्यापाड्यातील अडाणी लोकांना पटावी व त्या तत्वांना धरून त्यांचे आचरण व्हावे. यासाठी खेड्यातून लोकांच्यात जागृती निर्माण करण्याचे काम जलसे चांगल्या प्रकारे करू शकतात. जलसा हे समाज प्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम आहे. पुष्कळ व्याख्यानांनी जे काम होत नाही ते काम एका जलशाने होते. या अनूभवातून सत्यशोधकांनी समाज जागृतीसाठी या माध्यमाचा उपयोग केला. सत्यशोधक जलशांना गणाने प्रारंभ होई. त्यानंतर शिवाजी महाराजासंबधी पोवाडा म्हणण्यात येई. मग जलशाला सुरवात होई.

ब्राह्मण समाजाचे खोटे स्तोम खेडेगावच्या लोकांच्या मनातून कमी झाले पाहिजे तरच ते सुधारणा करावयास तयार होतील. खेडेगावच्या ब्राह्मणावर जो गावच्या लोकांचा विश्वास असतो तो इतरांवर नाही. अशा स्थितीत ब्राह्मणांचा मोठेपणा बेगडी आहे, ब्राह्मण आपल्यासारखेच आहेत अशा गोष्टी प्रथम ग्रामीण समाजास पटवून दिल्या पाहिजेत. त्याशिवाय त्यांच्या मानगुटीवरील ब्राह्मणाचे स्तोम नष्ट होणार नाही हे लक्षात घेऊन सत्यशोधक जलशांनी ब्राह्मणांच्या ब्राह्मण्यांवर प्रथम कोरडा ओढण्यास सुरूवात केली.[२६]

बऱ्याच जलशातून प्रथम 'सत्याजीचं' कथानक लावले जाई. जत्रेनिमित्त सत्याजी व त्याचा मित्र पाहुण्याच्या गावी जातात. घाटावर दोघे आंघोळीला जातात - लोकांची एका घाटावर प्रचंड गर्दी - वरचा घाट मोकळा. हजारो लोकासाठी एक घाट व चार-दोन माणसासाठी एक घाट. ब्राह्मणांच्या घाटावर जाण्यासाठी त्यांचे मन कचरू लागते. ब्राह्मण शाप देऊन भस्म कसे करतात ते तर पाहू असे सांगून सत्याजी त्याच्या मित्राची समजूत काढतो व दोघे ब्राह्मणाच्या घाटावर जाऊन आंघोळ करतात. इतक्यात ग्रामजोश्याची मुलगी-यमुना पाणी भरण्यासाठी त्याच घाटावर येते. या

दोघांना आंघोळ करताना पाहिल्यानंतर ती त्यांना टाकून बोलते. सत्याजी तिला जशास तसे उत्तर देतो. त्याच्या उत्तरांनी यमुना नरमते. मग सत्याजी तिला तुम्ही आम्ही एकाच देवाची लेकरे. तुमचा मोठेपणा पोकळ आहे. तुमच्या तात्याला बोलव म्हणजे ब्राह्मण्य हे जन्मावर नाही हे मी पटवून देतो असे सांगतो तेवढ्यात यमुनेला वेळ झाला म्हणून तिला पाहण्यासाठी तात्या येतात. त्यांचा सत्याजीचा ब्राह्मण्यावर वाद होतो. सत्याजीपुढे त्यांचा पराभव होतो. शास्त्राधार बेताचाच असल्याने ब्राह्मण्यांचा बेगडी डोलारा कोसळू लागतो. या वादाचा श्रोत्यावर परिणाम होतो. ब्राह्मणावर विश्वास ठेवणे योग्य नाही. स्वतःच्या मोठेपणासाठी ब्राम्हण वाटेल ते शास्त्रार्थ सांगण्यास कचरत नाहीत हे श्रोत्यांना पटते. अशाप्रकारे जलशातून ब्राह्मण्यावर कोरडे ओढून समाज प्रबोधन केले जाई.

धर्माच्या बाबतीत व सामाजिक आचारविचारात ब्राह्मण निष्ठूर असतो. आपल्या घरातही ब्राह्मणाचे वर्तन अरेरावीचे असते हे दाखविण्यासाठी रोजच्या व्यवहारातील एक दृश्य दाखविण्यात येई. गावच्या कुलकर्ण्याच्या मुलीचे लग्न - प्रथम ब्राह्मणांच्या पंक्ती व नंतर त्यांचे खरकटे अस्पृश्यांना दिले जाई. भिमराव महामुनी यांनी या प्रसंगाचे वर्णन फार छान केले आहे.

''थाळे तांबे मुले लेकरे आले घेऊन।

पडक्या घरात जागा केली बसा जाऊन।

केशरी भात थोडा थोडा वाढा ताटान।

वडे भाज्या नमाही उराच्या घ्या चालवून।''

अशाप्रकारे ब्राह्मणेत्तर खेडवळ ब्राह्मणाच्या घरी जेवावयास गेला तर त्याचा पाहुणचार कसा होतो हे देखील कधी कधी दाखविण्यात येई.

जलशामध्ये ब्राह्मणी अंतःकरणाचा आणखी एक मासला दाखविण्यात येत असे. कुलकर्णीबुवांचा जावई मुंबईत प्लेगाच्या साथीने मेल्याची तार येते. बिचाऱ्या यमूवर आभाळच

कोसळ्यासारखे होते. तिच्या शोकास सीमा रहात नाही. तशातच तात्याच्या मनात तिचे केशवपन करण्याचा विचार येतो. हे शास्त्र आहे असे तात्या तिला ठासून सांगतात. पण तिला हे शास्त्र समजत नाही. हातपाय जसे आपले तसे केस आपले आहेत. नवऱ्याचा त्यावर हक्क काय ? तात्या सांगतात - लग्नाने तू सर्वस्वी नवऱ्याची झालीस. तुझ्या देहाचा मालक नवरा. हा युक्तीवाद तिला पटत नाही. नवऱ्याने माझे हात अगर पाय तोडण्याचा विचार केला असता तर ते कोणी मान्य केले असते काय ? शिवाय माझा केशकलाप मृतपतीला काय उपयोगाचा ?

या कथानकातील यमूच्या तोंडची विचारसरणी फार मार्मिक व करूणाजनक आहे. तात्यांची शास्त्रार्थाची सारी लटपट व्यर्थ ठरते. अखेर तात्या अरेरावीचे धोरण पत्करतात. त्यावेळचे यमुच्या तोंडचे पद फार लोकप्रिय झाले होते. भीमराव महामुनींनी ते केलेले आहे.

मी लाडकी, अण्णा तुमची लडकी।
मला, कशी करिता हो बोडकी ॥ध्रृ॥
- - - - -
तुम्ही सोडा हट्ट। लावा माझा पाट।
करा बेत तुम्ही हाच की ॥

तरुण विधवांचे केशवपन हा त्यांच्यावर मोठा जुलूम आहे. प्रत्यक्ष बापही निष्ठुर. स्वतः तिसरे, चौथे लग्न करील पण मुलीला वैराग्याचा उपदेश करील. अशाप्रकारच्या न्यायनिष्ठुर शास्त्रीपंडीतांना बहुजन समाजाची काळजी वाटेल व त्याला ते खऱ्या गोष्टी शिकवितील अशी आशा करणे व्यर्थ आहे.[२७]

याशिवाय सत्यनारायण, वास्तुशांती अशा निरनिराळ्या प्रसंगाचे फार्स करून दाखविण्यात येत. गरीब, अंडाणी, भोळ्या भाबड्या लोकावर ऐदी वर्ग कसा चरतो, याचे वर्णन जलशात करून दाखविले जाई.

जलशामध्ये सत्या, विदूषक, नाचा इ. पात्रे असत. एका जलशामध्ये ६ ते १२ लोक असत. जलसे संध्याकाळी गावच्या पारावर होत. जलशाचा कार्यक्रम फुकट असे. जलशातील लोकांना गावातील लोक जेवण देत असत. सर्व एकाच पंक्तीला बसून जेवण करीत. अंधश्रध्दा, देवभोळेपणा, भटशाहीविरूध्द बंड अशा स्वरूपाचा कार्यक्रम जलशात होत असे. खेड्यातील लोकांना तमाशाची फार आवड असते. कारण त्यांच्या विचारशक्तीला ताण न देता त्यांची करमणूक करण्याचे काम तमाशा करतो. सत्यसमाजियन जलसे खेडवळांचे तमाशेच होते.[२८] तथापि तमाशातील अश्लील, अचकट विचकट भाग जलशात नव्हता. जलशामध्ये करमणूकीतून प्रबोधन केले जात होते. भिक्षुकशाही मोडून स्वतःची उन्नती स्वतः केली पाहीजे हे जलशातून सांगितले जात होते. देव कधी नैवेद्य खात नाही, कधी बोलत नाही हे सांगून समाजपरिवर्तन केले जात होते. शाहू, शिवाजी, बुद्ध यांचे उल्लेख करून समाजसेवा कशी करावी याची माहिती जलशातून दिली जाई.[२९]

अंधश्रध्दा आणि रूढीचा पगडा असलेल्या ग्रामीण समाजाला सत्यमार्ग दाखविणे हे सत्यशोधक समाजाचे कार्य जलशांनी प्रभावीपणे केले. ज्या-ज्या ठिकाणी जलशांचे कार्यक्रम झाले. त्या पैकी पुष्कळ ठिकाणी सत्यशोधक समाजाची केंद्रे स्थापन झाली. ब्राह्मणेत्तर लोकांत शिक्षणप्रसार करण्याचे व धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील अन्याय दूर करण्याचे कार्य जलशांनी केले. सातारा जिल्हयात असे अनेक जलशे तयार झाले होते. लोकशाहीर पुंडलिक फरांदे (सातारा), तुकाराम गणपत भोसले (कडेपूर), महाराष्ट्र शाहीर बाबूराव भोईटे (तडवळे, ता. कोरेगाव), तुकाराम जाधव (अतीत), जे. बी. लहीगुडे (नांदवळ) इ. मंडळी सत्यशोधक जलशामधून समाज प्रबोधन करीत होती.[३०] भिलवडी (जि. सातारा) येथील श्री भाऊराव पाटोळे यांचा एक जलसा होता. इतर बऱ्याच जलशांना ब्राह्मण लोकांकडून ब्राह्मणद्वेष्टेपणाचे सर्टीफिकीट मिळे पण सुदैवाने ते श्री. पाटोळे यांच्या वाट्याला आले नाही. यावरून कोणाचेही दोष त्याला पटतील पण मनाला लागणार नाहीत. अशा

रीतीने सांगण्याची हातोटी श्री पाटोळे यांना बरीच अवगत असावी. लोकांचे केवळ दोष दाखविल्याने सुधारणा होत नसून ते दोष सुधारण्याचे मार्ग सांगीतल्यानेच ती होत असते. ते कार्य जलशांनी केले. महाराष्ट्रातील मराठी माणूस जागा केला. त्याला शहाणे करण्यासाठी त्यांनी सारा महाराष्ट्र पिंजून काढला.

## सत्यशोधकी विवाह

लग्नविधी करताना पुरोहित वर्ग बहुजन समाजाची पिळवणूक करीत होता. निर्मिक व माणसे यात मध्यस्थाची गरज नाही म्हणून धर्मविधीतील दलाल बाजूला करून त्याजागी सत्यशोधक पध्दतीने विधी करावयास सुरूवात केली. ब्राह्मण भिक्षुकाशिवाय सत्यशोधक पध्दतीने त्यांनी १८७४ मध्ये ग्यानबा ससाणेचा पहिला विवाह लावला.[३१]

म. फुले हे प्रथम पुरोहित झाले, पौरोहित्याचे स्वातंत्र्य सत्यशोधक चळवळीने सर्वांना मिळवून दिले. कायद्याने आज ते खुले झाले आहे. स्वयंपुरोहित पध्दतीत अनिष्ठ चालीरीती वगळल्या होत्या. सत्यशोधक पध्दतीने लग्ने लावून त्यातून सामाजिक पण उपयुक्त संस्थांना देणग्या दिल्या जात होत्या. सत्यशोधक विवाह विधी अगदी सोप्या पध्दतीने तयार करण्यात आले होते. असे विवाह पुढील प्रमाणे लावले जात असत. प्रथम वरास पाटावर पुर्वेकडे तोंड करून उभे करीत व वधूस त्याचे समोर पश्चिमेस तोंड करून उभे केले जाई. दोघांच्या हातात फुलांच्या माळा देऊन पुढील प्रमाणे मंगल पंचक म्हटले जाई.[३२]

१) वर - समाजनियमा प्रमाण धरूनि चाले तुझे कूळ गे।
सत्यानें अवघ्यात थोर अससी तैसेच है त्वत्सगे।
अज्ञाना सम दृष्टीने शिकविसी तू ज्ञान त्या दाविसी।
प्रीतीने तुज आज मी वरितसे ऐकोना कीती अशी ।।१।।

शुभ मंगल सावधान ॥

२) वधू - मानिसी जरी तू दिले प्रतिदिनी कर्त्या समाधानसे ।
नारिना सगळ्या असे बहुपिडा हे नेणसी तू कसे ।
स्वातंत्र्यानुभवाची ओळख आम्हा झाली नसे मानसी ।
यासाठी अधिकार देईन स्त्रिया घे आण त्याची अशी ॥२॥

शुभ मंगल सावधान ॥

३) वर - स्थापाया अधिकार मी झटतसे या बायकांचे सदा ।
खचाया मनी मी न मि किमपैाहि सर्वस्व माझे करा ।
मानी मी सगळ्या स्त्रियांस मगिनी तू एकली मत्प्रिया ।
शीलाते स्मरूनी पणास करतो सोडी कधी ना तया ॥३॥

शुभ मंगल सावधान ॥

४) वधू - बंधूतुल्या मला समस्त असती त्वम्दिन्न जे की नर ।
आशामग तुझा करीन न कदा मी सत्यरूपावर ।
ठेवोनि अवघाच भार झटुया लोका कराया हिता ।
हाताला धरूनि तुला वरितसे सर्वापुढे मी आता ॥४॥

शुभ मंगल सावदान ॥

५) समाजाच्या आशिर्वाद -

आभारा बहु मानिजे अपुलिया माता पित्यांचे सदा ।
मित्रांच्या तुमच्या तसेच असती जे इष्ठ त्यांचे तदा ।
वृध्दा पंगुस साह्य द्या मुली मुला विद्या तशी शीकवा ।

हषे वृष्टा करा फुलांची अवघे टाळी आता वाजवा ॥५॥

शुभ मंगल सावधान ॥

मंगल पंचक झाल्यावर सर्वजण टाळ्या वाजवून लग्न झाल्याचे जाहीर करीत. नंतर वधूवर एकमेकांच्या गळ्यात फुलांच्या माळा घालीत व पुढील वाक्ये म्हणून परस्परांच्या डोक्यावर अक्षता ओंजळीने टाकीत.

वधू. तू माझ्या इच्छा पूर्ण कराव्या.

वर. तू माझ्या इच्छा पूर्ण कराव्या.

वधू. संपती माझ्या इच्छा पूर्ण करो.

वर. कायदा माझ्या इच्छा पूर्ण करो.

वधू. संपत्ती माझ्या इच्छा पूर्ण करो.

वर. यश माझ्या इच्छा पूर्ण करो.

वरासह वधूस बाहुल्यावर किंवा दोन पाटावर किंवा दोन चौरंगांवर समोरा समोर बसवीत व त्यांच्या चार बाजूस पाण्याचे चार कलश ठेवून त्यांस सुतवून पाण्याचा एक कलश मध्ये ठेवीत व वधुवरांस प्रतिज्ञा देत.

वर - मी अशी प्रतिज्ञा करतो की, आजपासून तू माझी भार्या झाली आहेस. तुजशिवाय इतर बायका मला आई बहिणीसारख्या आहेत. कायद्याचे आचरण, संपती व सुखाचा उपभोग मी तुझ्या बरोबर घेईन. तुला आवडणार नाही असे मी काही करणार नाही. आज हे सर्व वडील जमले आहेत त्यांच्या समक्ष मी तुला हे वचन देतो.

वधू - मी अशी प्रतिज्ञा करते की, आजपासून तू माझा भ्रतार आहेस. तुझ्याशिवाय इतर पुरुष मला बाप भावासारखे आहेत. आपल्या सुख दुःखाची वाटेकरीण मी आहे. आम्हा उभयतांस संतती व

संपत्तीचे सुख मिळो. आज हे सर्व वडील जमले आहेत त्यांच्या समक्ष मी तुला हे वचन देते.

वडिलांचा उपदेश - बाळानों पती हा पत्नीचा व पत्नी ही पतीचा आवडता मित्र, सर्व आप्त इष्टांचा समुदाय, सर्व इच्छा, सर्व खजिना, फार तर काय एकमेकांचा प्राण आहे हे ध्यानांत ठेवून वागा. तुमचा संसार सुखाचा होवो.

नंतर वराने - हे भाग्य संपन्न स्त्रीचे नवऱ्याच्या जीवनाला कारणभूत असे मंगळसूत्र मी तुझ्या कंठांत बांधतो. तू शतायू हो. असे म्हणून वधूच्या गळ्यात मंगळसूत्र बांधावे.[३३]

<u>सत्यशोधकी विवाहाची वैशिष्ठे</u>

१. वधु पक्षाकडून वर पक्षाला मुळीच हुंडा नको.

२. वाजंत्री नको.

३. मंडप नको

४. आहेर, देणगी नको.

५. प्रेझेन्ट या सप्रेम भेट नको.

६. घोडा गाडी नको, डेकोरेशन नको.

७. लाऊडस्पीकर नको.

८. भपकेपणा, डामडौलपणा नको.

९. सोने चांदीचा लोभ नको.

१०. धावपळ नको.

११. चिंता व डोकेदुखी नको.

१२. कर्जबाजारी होणे नको.

१३. लग्नास समाज बांधव, नातलग, परीवार, इतर मित्रमंडळी हया सर्वांची प्रवासाची दगदग व

त्यांचे पैसे बचत.

१४. दोन्ही पक्षाची कमीत कमी ५०० मंडळी धरली व प्रत्येकी १०० रू खर्च धरला तर जवळ-जवळ ५० हजाराची बचत.

१५. अनाठाई व्यर्थ खर्चापासून वधू-वर दोन्ही पक्षाचा बचाव होतो.[३४]

वरील प्रमाणे खर्चात बचत होत असल्याने अनेक विवाह हे सत्यशोधकी पध्दतीने होऊ लागले. भक्तवडी, पाडळी (सातारा जिल्हा) या गावात अनेक वर्षे ब्रम्हण नव्हता. साताररोड येथील सुरेशराव ज्योत्याजीराव फाळके यांचे लग्न पुडंलीक हरी घाटगे (गुरुजी) यांनी लावले.[३५] घाटगे गुरुजींनी पौराहित्य करून इतर अनेक लग्ने लावली. भक्तवडीतील दत्ताजीराव जाधव यांच्या तीन मुलांची लग्ने सत्यशोधकी पध्दतीने घाटगे गुरुजींनी लावली. बाबासाहेब दत्ताजीराव जाधव यांचा विवाह बापूसाहेब विठोबा तावरे यांची बहिण निर्मला यांच्याशी दिनांक २५ एप्रिल १९५९ रोजी तसेच दत्ताजी जाधव यांचे द्वितीय चिरंजीव गोरखनाथ दत्ताजी जाधव यांचा विवाह यदू महादू शिंदे (पाटरवळ ता. सातारा) यांची कन्या लिलावती यांच्याशी पाटरवळ येथे ४ मार्च १९६१ रोजी झाला आणि वसंतराव दत्ताजी जाधव यांचा विवाह विष्णू शिवबा शिंदे (बसाप्पाचीवाडी ता. सातारा) यांची कन्या लक्ष्मी यांच्याशी सातारा (भोरकरवाडा) येथे झाला. या तिन्ही लग्नाला पौरोहित्य पुंडलिक हरी घाटगे यांनी करून हे विवाह सत्यशोधक पध्दतीने लावले.[३६] तसेच केशवराव विचारे यांच्या ५ मुले व ५ मुलींची लग्ने सत्यशोधक पध्दतीने लावण्यात आली होती. या सर्व बहिण-भावांच्या लग्नात कोणत्याही प्रकारचे सोवळे-ओवळे न करता कन्हेरीच्या फुलांच्या माळा गळ्यात घालून पुरोहिताशिवाय लावली.[३७]

सातारला बागडे समाजात सामुदायिक विवाह प्रथा शाहीर पुंडलिक फरांदे यांनी चालू केली. तसेच प्रकाश पुंडलिक फरांदे यांनी स्वतः पौराहित्य करून किरण भुजबळ (कोंडवे) यांचे लग्न

लावले. या लग्नसोहळ्यात हळदी, साखरपान असा कोणताही विधी करण्यात आला नाही. तांदळा ऐवजी फुलांचा उपयोग केला.[३८]

सर्व लग्न समारंभावर पुरोहिताचे वर्चस्व असायचे, त्यांच्या दक्षिणा-दान-होम या अनावश्यक बाबीसाठी मोठा खर्च व्हायचा. पैसा नसताना खोट्या प्रतिष्ठेपायी कर्ज काढून खर्च केला जात असे. यासाठी अनेक शेतकरी कुंटूबांना आपली जमीन, घर-दार सावकाराकडे गहाण ठेवावे लागे. लग्नामध्ये हौस-मौज, मान-पान यासाठी वारेमाप खर्च केला जात असे. नाना पाटील म्हणजे म. फुलेंच्या विचारांचे कृतिशील वारस होते. या गोष्टींना सहाजिकच नाना पाटील यांचा विरोध होता. ते समाजाला नेहमी सांगत लग्नात पोकळ टेंभा मिरवू नका. डामडौल करू नका. हुंडा घेऊ नका. पुरोहित वर्गाचे वर्चस्व वाढवू नका. १९२२ साली त्यांचे लग्न दुधोंडीच्या कृणा नलवडे यांची कन्या आकूबाई हिच्याशी निश्चित झाले. त्यांनी स्वतःचे लग्न हुंडा न घेता अत्यंत साधेपणाने केले. लग्नात हुंडा, मानपान, वरात, घोडा, वाजंत्री नाहीच पण लग्न लावण्यासाठी पुरोहितही नाही. पुरोहिताशिवाय स्वतःच त्यांनी मंगलाष्टका म्हणून आपले लग्न केले. त्यांचे लग्न म्हणजे त्या काळातील सातारा जिल्ह्यातीलच नव्हे तर पश्चिम महाराट्रातील चर्चेचा विषय होता. सत्यशोधक चळवळीकडे लोक त्यामुळे जास्तच विश्वासाने पाहू लागले. प्रथम स्वतःचे लग्न सत्यशोधक पध्दतीने व साधेपणाने तर केलेच पण पुढे जावून स्वतःच्या बहिणीचे-गंगुबाई यांचे लग्न आपले चळवळीतील सहकारी नाथाजी लाड यांच्याशी व पुढे स्वतःची एकुलती एक मुलगी हौसाताई हिचे लग्न श्री. भगवान राव पाटील (बप्पा) यांचेशी अत्यंत साधेपणाने व कमीत कमी खर्चात लावून दिले.[३९]

सांगलीचे रहिवाशी आणि मुंबईचे प्रसिध्द मराठा डॉक्टर नानासाहेब आप्पाजी शिंदे यांच्या कन्येचा विवाह जळगावचे सुप्रसिध डॉ. बाबुराव रामभाऊ पवार यांचे कनिष्ठ बंधु चि. हनुमंतराव यांच्याशी सांगली मुक्कामी झाला. या विवाहाचे पौरोहित्य रघुनाथ दौलतराव साळुंखे आणि श्री

दत्तात्रय आप्पासाहेब भोसले यांनी केले.[४०] हरीभाऊ भिकोबा फाळके यांचे १९४४ मध्ये पिंपोडे खु।। येथील कन्येशी पिंपोडे या ठिकाणी लग्न लावण्यात आले. या विवाहास भास्करराव जाधव हजर होते. जिजाबा फाळके सातारारोड यांची कन्या आणि किसनराव बर्गे, कोरेगाव यांचा विवाह कोरेगाव या ठिकाणी सत्यशोधक पध्दतीने लावण्यात आला. या विवाहाचे पौराहित्य पवार गुरुजी (कोरेगाव) यांनी केले.

अशा प्रकारे सत्यशोधक चळवळीने साधेपणाने लग्नविधी प्रथा सुरू केल्याने समाजाचा आनाठायी खर्च वाचला. सावकारी पाशातून जनतेची मुक्तता झाली. पुरोहित वर्गाचे वर्चस्व नष्ट झाले. अशा प्रकारे समाजाला कृतीशील दिशा देण्याचे कार्य या चळवळीने सत्यशोधकी विवाह पध्दतीतून केले.

## सत्यशोधक चळवळ व सहकार

भारतात सहकार चळवळीची सुरुवात १९०४ मध्ये झाली. केशवराव विचारे यांनी आपले सर्व आयुष्य सातारा जिल्हयातील सहकार चळवळीला वाहून घेतले होते. शेतकरी कर्जमुक्त झाला पाहीजे, शेती हा व्यवसाय किफायतशीर ठरला पाहिजे, यासाठी सहकाराशिवाय पर्याय नाही ही म. फुले यांची शिकवण ग्रामीण परिसरात रूजविण्याचे कार्य केशवराव विचारे यांनी केले. बदलत्या सामाजिक परिस्थितीचा विचार करून त्यांनी सत्यशोधक समाजासाठी एक नवा कार्यक्रम दिला.

इ. स. १९२१-२२ साली केशवराव विचारे कोरेगाव, सातारा, वाई, खटाव या तालुक्यात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे ऑर्गनायझर होते. इ. स. १९३३ ते १९३९ या काळात बॉम्बे प्रोव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटच्या सातारा शाखेचे ते अध्यक्ष होते.[४१]

**जांभूळवाडी कृषि औद्योगिक वसाहतीची योजना**

भारत हा शेतीप्रधान देश आहे. शेतकऱ्यांचा शेती व्यवसाय फायदेशीर होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. शेतकऱ्याचे सारे कुटूंब शेतात राबत असते. त्यांना जमिनीत किती भांडवल गुंतवावे लागते ? किती तास श्रम करावे लागते ? एकंदर मजूरी काय पडते ? नफा किती मिळतो ? या सर्व गोष्टींचा विचार करून शेती केली पाहिजे असा विचार केशवरावांनी मांडला. अपुरे भांडवल, जमिनीचे तुकडे इ. अनेक कारणामुळे शेती व्यवसाय तोट्याचा ठरतो. म्हणून शेती व इतर उदयोगधंदे सहकार्याच्या तत्वावर चालवले तर ते फायदेशीर होऊ शकतात हा विचार बहुजन समाजांत रूजविण्यासाठी १९३४ साली केशवराव विचारे यांनी जांभूळवाडी (सातारा रोड) येथे ''जांभूळवाडी कृषि औद्योगिक वसाहतीची योजना'' अंमलात आणली.[४२]

सुधारीत पध्दतीने शेती करणे, आधुनिक पध्दतीने शेती करणारांचा वर्ग तयार करणे, शेतीस आवश्यक असणाऱ्या वस्तू तयार करणे इ. उद्दिष्टे ही योजना अमलात आणण्यामागे होती. स्वतःचे सुख व प्रगती महत्वाची न मानता सर्व सभासदांचे हित व विकास महत्वाचा मानला होता. तसेच श्रमिक व बुध्दीजीवी या दोघामध्ये सहकार्य घडवून गावचा विकास होईल आणि श्रमजीवी माणसाचे कष्ट कमी होतील. हा या योजनेचा फायदा होणार होता. कामाचे तास कमी होऊन विदयार्जनासाठी वेळ मिळेल. शेतीला जोडून निरनिराळे उदयोगधंदे काढता येतील. पक्का माल तयार करून तो विकता येईल व शेतकऱ्यांचा फायदा होईल. वरील दृष्टीकोन पुढे ठेवून केशवराव विचारे यांनी स्वतःची खरेदी केलेली ४७ एकर जमीन प्रकल्पाला दिली. वैंकुठलाल मेहता यांच्या उपस्थितीत २३ जानेवारी १९३४ रोजी या योजनेला प्रारंभ झाला. या प्रकल्पास ''जांभूळवाडी को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल कॉलनी लि.'' असे नाव देण्यात आले. या सोसायटीत केशवराव विचारे व ११ सदस्य व त्यांचे कुंटूब एकत्र आले होते. केशवराव विचारे हे सोसायटीचे अध्यक्ष होते. या सोसायटीत सहभागी

झालेले मेंबर व त्यांची माहिती पुढीलप्रमाणे -

जांभूळवाडी इंडस्ट्रियल कॉलनी (सातारा रोड) कॉलनीतील मेंबर लोकांची सर्वसाधारण माहिती.

| | मेंबरचे नाव | वय | शिक्षण | पूर्वीचे राहण्याचे ठिकाण | मेंबरवर अवलंबून असणारी कुटुंबातील इतर मंडळींची संख्या. |
|---|---|---|---|---|---|
| १ | के. व्ही. विचारे | | | सातारा रोड | आई, बायको,९ मुले |
| २ | जी. बी. कपाळे | २६ | व्ह.फा.सुपरवायझर पास | बोरगाव | नवरा, बायको |
| ३ | जी. बी. शिंदे | २४ | व्ह.फा.सुपरवायझर पास | बोरगाव | नवरा, बायको |
| ४ | जी. एच. विचारे | २५ | व्ह.फा.शेतकी कॉलेज | सातारा रोड | नवरा, बायको |
| ५ | एस. ए. शिर्के | २१ | मराठी ६ इयत्ता पास | चिवेली | नवरा, बायको |
| ६ | बी. बी. लाड | ३२ | मराठी | धुमाळवाडी | नवरा, बायको |
| ७ | बी. बी. भोईटे | २८ | मराठी | देऊर | नवरा, बायको |
| ८ | डी. एस. चव्हाण | २४ | वृ. फा. पास | वाघोळी | अविवाहित |
| ९ | एस. एच. विचारे | २० | वृ. फा. पास | सातारा रोड | अविवाहित |
| १० | ए. टी. शेळके | २५ | नॉन मॅट्रिक | जावळवाडी | अविवाहित |
| ११ | ए. जी. जावले | २३ | नॉन मॅट्रिक | कुमठे | नवरा, बायको |
| १२ | बी. एस. चांभार | १९ | मराठी ३ इयत्ता | पिंपोडे खुर्द | फक्त स्वतः |

४३

वसाहतीसाठी लागणारे भांडवल, प्रवेश फी, शेअर, देणग्या इत्यादीद्वारे उभारण्यात आले होते. १२ सभासदांनी प्रत्येकी १० रुपये किंमतीचा शेअर घेतला होता. प्रत्येक सभासदास १ रुपया प्रवेश फी होती. शिवाय देणग्याद्वारे भांडवल उभे केले होते. या सहकार वसाहतीचे वैशिष्टये म्हणजे धर्म, जात यांना आजिबात थारा नव्हता. सर्व जातीची कुटुंबे सभासद म्हणून सामील झाली होती. सर्व सभासदांना समान दर्जा होता. म. फुलेंना अभिप्रेत असलेले जातीभेद निर्मूलन व सामाजिक समता या वसाहतीत प्रस्थापित झाल्याचे दिसते जांभूळवाडीचा हा प्रकल्प १९३४ ते १९४५ पर्यंत चालला होता.

## फाळके पाडळी सामुदायिक शेती सहकारी सोसायटी लि.

जांभूळवाडी प्रकल्पाच्या अनुभवातून केशवरावांनी इ. स. १९४६ ते १९५२ या कालखंडात पाडळी व भक्तवाडी येथे दोन सामुदायिक शेती-सहकारी सोसायट्या राबविल्या. दि. २ डिसेंबर १९४६ रोजी या सोसायट्या सुरु करण्यात आल्या. त्यापैकी एका सोसायटीचे नाव ''फाळके पाडळी सामुदायिक शेती सहकारी सोसायटी लि.'' असे होते. तिचा रजिस्टर नंबर ९५१३ होता. या सोसायटीतील माणसांचो संख्या ८८ होती. सोसायटीत मेंबराची संख्या १७ होती. या सोसायटीसाठी १४६ एकर ३९ गुंठे जमीन एकत्रित करण्यात आली होती. या सोसायटीत जनावरांची संख्या ३० होती. या जमिनीत दोन विहीरी होत्या. ज्वारी, बाजरी, भूईमूग इत्यादी पिके घेतली जात. हा प्रकल्प ५-७ वर्षे चालविण्यात आला होता.[४४]

## भक्तवडी सामुदायिक सहकारी शेती सोसायटी लि.

पाडळी येथील सोसायटी बरोबरच भक्तवाडी (ता. कोरेगाव) येथे ''भक्तवडी सामुदायिक सहकारी शेती सोसायटी लि.'' ही सोसायटी सुरू करण्यात आली. तिचा रजिस्टर नंबर ९५१४ होता. या सोसायटीची मेंबर संख्या १२ होती. कुटूंबात एकूण व्यक्ती ४० होत्या. या सोसायटीसाठी १३५ एकर १२ गुंठे जमीन मिळविली होती. जनावरांची संख्या २३ होती. शेतीतून ज्वारी, बाजरी, कडधान्ये इ. पिके घेतली जात. या सोसायटीच्या धर्तीवरच विचारे यांनी 'भक्तवडी को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी अनलिमिटेड'' व ''वसना डेअरी सोसायटी लि.'' हे मोठे प्रकल्प सुरू केले होते.[४५]

## सत्यशोधक चळवळीचे इतर कार्य

### सत्यशोधकी कीर्तन

पुंडलीक हरी घाटगे यांनी सत्यशोधकी कीर्तनातून समाजप्रबोधन केले ते केशवराव विचारे

यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक विद्यार्थी संघाला शिकविण्याचे काम केले. त्यांनी सत्यशोधकी कीर्तन हा नवीन प्रकार सत्यशोधक चळवळीच्या प्रचार व प्रसारासाठी सुरू केला. या कीर्तनात जवळ-जवळ २५ लोकांचा संच असे. यामध्ये पेटी-ढोलकी अशी वाद्ये होती. कीर्तनाचा मूळ विषय - ''सर्व दुःखाचे मूळ अज्ञान व सुखाचे माहेर ज्ञान'' हा होता. तसेच ''पंढरीला जावू नका, आई पांढरीची सेवा करा'' असा उपदेश करून त्यांनी समाजप्रबोधन केले. ''देव-धर्म-नशीब'' खोटे आहे हे त्यांनी ठासून सांगीतले. अंधश्रध्देविरूद्ध आवाज उठविला. कीर्तनातून अनेक गावात अभिनव ग्रामसुधारणा केली. श्रमदान करून गावात चावड्या, समाजमंदिरे, रस्ते बांधले. तसेच झाडे लावली. तसेच ब्राम्हणशाहीला विरोध केला.[४६] तसेच सत्यशोधक चळवळीच्या कार्यकर्त्यांनी सातारा जिल्ह्यात अनेक सहकारी संस्थाची स्थापना केली. कोरेगाव तालुक्यात क्रेडीट सोसायट्यांची स्थापना केली. उदा. जांब, दुघी इ.[४७]

भाऊराव पाटील ऐतवडेकर, आकारामराव (सोनी) व काले येथील मंडळीनी औंदुबरच्या यात्रेतील भटांचे प्रस्थ मोडून टाकून ब्राह्मणेतरांचा वेगळा प्रसाद सुरू केला व परळी सज्जनगड येथील रामदास स्वामींच्या यात्रेतील ब्राह्मणेतरांवरील अन्यायसही आळा घातला.[४८]

केशवराव विचारे यांनी जातपात मोडून टाकण्यासाठी महिन्यातून एकदा घरी जेवण ठेवीत. एकाच पंक्तीला बसून सारे जेवण करीत. जेवणाच्या पंक्तीत पाटलाशेजारी महार, मुस्लीम यांना बसवीत. यातून जात-पात मोडण्याचा त्यांनी प्रयत्न केला.[४९] जेवण पत्रावळीवर जेवत आपली पत्रावळी आपणच उचलून टाकीत.

कै. भाऊसाहेब कळंबे या क्रांतीकारकाने बहुजन समाजातील तरुण पिढीला सत्यशोधकीय विचार व संस्कार देण्याच्या हेतुने कराडला 'विजयाश्रम' चालविला होता. कंळबे यांनी चालू केलेले पत्र 'कैवारी' नंतर जवळकर मुंबईस प्रसिध्द करू लागले.[५०]

सातारा येथे दिनांक ६/६/१९२१ रोजी मराठा मोफत वाचनालयामध्ये ब्राम्हणेत्तरांची केशवराव विचारे यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरली होती. त्या सभेत सातारचे कलेक्टर मे. इ. एल्. मायसे व पाटणचे मामलेदार दुदुसकर यांच्याबद्दल भिक्षुकशाही पत्रे, जी खोडसाळ व सपशेल खोटी विधाने करीत आहेत त्याबद्दल तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच 'केसरी' ने कोल्हापूर सरकारचा खासगी पत्रव्यवहार चोरून तो उघडा केला आहे. त्याकरिता सरकारने हा छापखाना जप्त करावा आणि त्यात सरकारी वगैरे कागद असतील त्याचा सी. आय. डी. मार्फत तपास करून ऑडिटरवर खटला करावा. अशी सरकारला विनंती केली. तसेच कोल्हापूर सरकारने लवकर त्यावर उपाय करावा अशी विनंती कोल्हापूर सरकारास केली. तसेच या सभेने सर्व ब्राह्मणेत्तरास आग्रहाची विनंती केली की, ''यापुढे केसरी पत्र घेण्याचे बंद करावे.'' तसेच यापुढे कोणत्याही प्रकारची ब्राह्मणांची चळवळ हाणून पाडण्याच्या शपथा घेण्यास विनंती केली. या सभेत मद्यपानाचा निषेध करण्यात आला. या सभेत केशवराव विचारे, ए. बी. शिंदे, आर. डी. यादव, एम्. जी. देशमुख, पांडुरंग शंकरराव होनराव, नारायण धोंडजी सुर्वे, एम्. के. भोसले, लवंगरे, बी. एम्. नलवडे, टी. ए. जाधव, यशवंतराव बळवंतराव सावंत, हरीबा भवानजी कदम इ. मंडळी हजर होती.[५१] दत्ताजी जाधव यांच्या आई खाशीबाई बाजीराव जाधव यांना विचारे गुरुजींनी दाईपणाचे शिक्षण दिले. त्यांनी सातारा रोड, पाडळी, भक्तवडी या परिसरात मोफत दाईपणाचे कार्य केले.[५२]

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली वाई तालुका येथे १५/१/१९३३ रोजी अस्पृश्यता निवारण परिषद भरविली होती. हे सत्यशोधक चळवळीचेच फलित होते. याशिवाय भिक्षुकापासून लोकांची सुटका करण्याकरीता पुरोहिताची कामे बाबूराव पाडले, सीताराम नलावडे, गणपती चौधरी, माधवराव ढगे, जयसिंगराव मुंगसे हे करीत. भटांपासून लोकांची सुटका करण्याचे कार्य या लोकांनी केले. केंजळ ता. वाई जि. सातारा येथे श्री. मानसिंगराव केशवराव जगताप इनामदार यांनी सत्यशोधक

समाजाची स्थापना केली. तेच केंजळ येथील सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष होते. त्यांनी म. गांधीना भेटून सत्यशोधक समाजाने अस्पृश्यता निवारण्याचे कामी केलेल्या कार्याची आठवण करून दिली तेव्हा महात्माजी म्हणाले - ''सत्यशोधक समाजाच्या तत्वाप्रमाणे छत्रपति शाहू महाराज यांनी अस्पृश्यता नष्ट केली. हा त्यांनी स्वराज्याचा खरा पायाच घातला आहे, त्याची जाणीव मला पूर्ण आहे, प्रत्येकाने हा कित्ता पुढे ठेवून वागण्याचा प्रयत्न करावा.'' केंजळ येथे मोफत वाचनालय व प्रौढांचे शिक्षण ही कामे केली जात होती.[५३]

सत्यशोधक समाज ही संस्था नाही तर चळवळ म्हणूनच काम करीत राहिली. बहुजन समाजामध्ये सामाजिक, धार्मिक, आर्थिक. मानसिक गुलमगिरीच्या अंधारात पिचणारांच्या जीवनात जागृतीची पहाट सत्यशोधक चळवळीने निर्माण केली.

या चळवळीने समाजाची प्रगती रोखणाऱ्या दुष्ट चालीरीती, धर्मभोळेपणा, अज्ञान, जातीभेद नष्ट करून समता, बंधुता व सहकार हा मंत्र दिला.

<u>सत्यशोधक चळवळ आणि स्वातंत्र्य लढा</u>

राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनात झालेल्या वेदोक्त प्रकरणामुळेच सत्यशोधक चळवळीचे पुनरूज्जीवन झाले. कारण शाहू महाराजांना समाजातील जातीवाद, रूढीपरंपरा, अंधश्रद्धा, स्त्रीयांचे प्रश्न व वरिष्ठ वर्गाचे धार्मिक वर्चस्व नष्ट करण्यासाठी महात्मा फुलेंची सत्यशोधक विचारधारा उपयोगी पडेल याची पक्की खात्री शाहू महाराजांना झाली होती.[५४] म्हणूनच सत्यशोधक समाजाची कोल्हापूर संस्थानात पुनर्बांधणी करावी असे शाहू महाराजांना वाटू लागले त्यानुसार ११ जानेवारी १९११ रोजी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये संस्थानचे एक अधिकारी कै. भास्करराव विठोजीराव जाधव यांच्याद्वारे सत्यशोधक समाजाची कोल्हापुरात पुनर्बांधणी करण्यात आली.[५५] शाहू छत्रपतींनी सत्यशोधक समाजाच्या स्थापनेत पुढाकार घेतल्याने या चळवळीस राजाश्रय प्राप्त झाला.

सातार्‍यामध्ये कै. केशवराव विचारे गुरुजी यांच्या प्रयत्नामुळेच सत्यशोधक चळवळ वाढीस लागली. काले ता. कराड येथे केशव गणेश बागडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिषदेला बाबुराव हैबतराव यादव व भास्करराव विठोजीराव जाधव हे कोल्हापूरच्या सत्यशोधक समाजाचे प्रमुख पुढारी मार्गदर्शन करण्यासाठी आलेले होते.[५६] सत्यशोधक समाजाच्या या सभेचा वृत्तांत तत्कालीन डेप्युटी इन्स्पेक्टर कराड यांनी मुंबईच्या गृह खात्याला लिहून पाठविलेला आहे. त्यामध्ये या सभेस २,५०० लोक हजर असल्याची नोंद करण्यात आलेली आहे. या सभेस पुरुषांबरोबर बहुसंख्येने स्त्रीया आणि मुस्लिम समाजाचे लोक हजर होते. यात एकसुद्धा ब्राह्मण नव्हता.[५७] महात्मा जोतिबा फुले यांनी सुरू केलेला सत्यशोधक समाजाचा उद्देश हा संपूर्ण मानव मुक्तीचा होता. यामध्ये सर्व मानव समान मानण्यात आलेले आहेत. परंतू शाहू महाराजांच्या नेतृत्वाने सुरू झालेल्या सत्यशोधक समाजामध्ये कोणीही ब्राह्मण सत्यशोधक समाजाचा सदस्य झालेला नव्हता. किंबहुना सत्यशोधक चळवळीस या कालखंडात ब्राह्मणेत्तर चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले होते. ब्राह्मणी वर्चस्व नष्ट करणे हे या काळातील सत्यशोधक समाजाचे प्रमुख ध्येय बनले होते. ब्रिटिश सरकारवर या चळवळीने आपला पूर्ण विश्वास व्यक्त केलेला होता. या काळात सुरू असलेली स्वातंत्र्याची चळवळ ही ब्राह्मणांनी स्वतःच्या उत्कर्षासाठी सुरू केलेली चळवळ आहे. देश स्वतंत्र झाला तर मुठभर उच्चभ्रू ब्राह्मणांचा फायदा होईल व बहुजन समाज मात्र तसाच धर्मभोळा व गतानुगतिक जीवन जगणारा आणि पूर्णपणे निरक्षरच ठेवला जाईल असे सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांना वाटत होते. कारण टिळकांना देण्यासाठी टिळकफंडाची स्थापना करण्यात आली होती. या फंडास ब्राह्मणेत्तरांनी कोणतीही मदत करू नये असे पत्रक काढून सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी सातारा जिल्ह्यामध्ये पत्रके वाटली होती.[५८] शिवाय काँग्रेसच्या चळवळीमध्ये सत्यशोधकांनी भाग घेऊ नये अशी सत्यशोधक चळवळीची भूमिका होती. १९१९ पासून सत्यशोधक समाजाने सातारा जिल्ह्यामध्ये अभूतपूर्व अशी लोकजागृती घडवून

आणली. आणि रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून कर्मवीर भाऊराव पाटलांच्या अथक प्रयत्नाने शैक्षणिक कार्य करून जिल्ह्यामध्ये सुरूवातीच्या काळात प्राथमिक शिक्षण देऊन समाज जागृती केली.[५९] याचबरोबर सत्यशोधक चळवळीतील नेते केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर यांनी संपूर्ण मुंबई प्रांतामध्ये सत्यशोधक समाजाचा प्रचार जोरदार करून बहुजन समाजामध्ये आपल्या हक्कांबद्दलची जाणीव जागृती निर्माण केली.)

रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्यामुळे अनेक तरुण शिक्षित झाले. म. गांधीजींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीचा त्यांच्यावर प्रभाव पडू लागला. जातीयता नष्ट करणे, समाज एकजिनसी बनविणे व लोकांना स्वांतत्र्यांच्या चळवळीसाठी प्रेरीत करणे यासाठी गांधीजींनी अनेक उपक्रम सुरू केलेले होते. देशाला स्वांतत्र्य मिळवून देणे हे आपले आद्य कर्तव्य आहे असे सत्यशोधक चळवळीत काम करणाऱ्या तरुणांना वाटू लागले. त्यातूनच सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळीच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसने सुरू केलेल्या स्वांतत्र्य लढ्याच्या चळवळीत भाग घेऊन कार्य करण्यास सुरूवात केली. क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर नागनाथ आण्णा नायकवडी, जी. डी. लाड, भगवानराव पाटील, बाबूजी पाटणकर, इंदूताई पाटणकर, रामभाऊ लाड, म्हावशीचे घाटगे, पांडुरंग ससाणे, सर्जेराव गणपत जाधव, विष्णु बाबर या सत्यशोधक कार्यकर्त्यांनी स्वांतत्र्य लढ्यात भाग घेऊन भूमिगत झालेल्या स्वांतत्र्य सैनिकांना मदत केली.[६०] सातारा जिल्ह्यामधील विटा, खानापूर, तासगाव, वाळवे, कोरेगाव, वाई, पाटण, कुंडल ही गावे क्रांतिकारकांची प्रमुख ठिकाणे बनली. स्वांतत्र्य लढ्या अगोदर या गावांमध्ये सत्यशोधक चळवळीचे कार्य चालत होते.[६१] १९४२ नंतर क्रांतिसिंह नाना पाटील यांनी प्रतिसरकारचा लढा सुरू केला. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, सावकारशाही व धार्मिक वर्चस्व यापासून मुक्तता अन्याय निवारण इत्यादी प्रमुख उद्देशाने सातारचे प्रतिसरकार इंग्रजी राजवटीविरूद्ध काम करीत होते. प्रतिसरकारची ध्येयधोरणे ही सत्यशोधकी

विचारांशी मिळतीजुळती होती. एकंदरीत वरील सर्व गोष्टींचा विचार करता सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळीनेच पुढील काळात स्वातंत्र्य लढ्यात भाग घेऊन देशाला स्वांतत्र्य मिळवून देण्यासाठी महत्वपूर्ण कामगिरी बजावली.

# संदर्भ


१. पाटील टी. एस. कोल्हापूर संस्थानातील सामाजिक, राजकीय चळवळीचा एक अभ्यास (इ. स. १९२२ ते १९४०) अप्रकाशित शोध प्रबंध पृ. १८

२. डॉ. कडियाळ रा. [illegible], 'सत्यशोधक कै. नामदार भास्करराव जाधव यांचे जीवन व कार्य' इंदुमती प्रकाशन, पाचगांव प्र. आ. १९९० पृ. ३७

३. नलवडे उज्वला, सत्यशोधकाची संक्षिप्त गाथा, अजिंक्य सहकारी मुद्रणालय, सातारा पृ. २१

४. कित्ता पृ. २६

५. काटकर मा. भि., प्रबोधनाची धगधगती मशाल, कर्मवीर भाऊराव पाटील, कर्मवीर प्रबोधिनी, सातारा पृ. २८

६. कित्ता पृ. २९

७. राष्ट्रवीर - बेळगाव २५ डिसेंबर १९२१ पृ. ४

८. ठोके मो. नी., (संपा.) रा. ना. चव्हाण निवडक वाङःमय, पारख प्रकाशन, बेळगाव प्र. आ. मार्च १९८० पृ. ७३

९. जाधव उज्वला, केशवराव विचारे, जीवन व कार्य, अप्रकाशित शोध प्रबंध पृ. १६

१०. कारखानीस त्र्य. शि., 'कोल्हापूरातील सामाजिक चळवळी', सत्यशोधक समाज प्रबोधन पत्रिका १९९० (संपा. गुजर जयवंत)

११. बागल माधवराव, केशवराव विचारे - बहुजन समाजाचे शिल्पकार पृ. १३६

१२. विचारे केशवराव यांची हस्तलिखित वही - कॉरस्पॉन्डस विद्यार्थी संघ पृ. ५

१३. विचारे केशवराव यांची हस्तलिखित वही - कॉरस्पॉन्डस विद्यार्थी संघ पृ. ३

१४. मुलाखत - विचारे लक्ष्मण केशव दि. २४-५-२००२

१५. विचारे केशवराव यांची हस्तलिखित वही - कॉरस्पॉन्डस विद्यार्थी संघ पृ. ५७

१६. नरके हरी (संपा.) सत्यशोधक केशवराव विचारे समग्र वाङ्मय, पद्मगंधा प्रकाशन, पुणे प्र. आ. मार्च २००० पृ. ८२

१७. कित्ता पृ. ६८

१८. सत्यशोधक विद्यार्थी संघ - प्रतिज्ञा पत्र

१९. नरके हरी (संपा.) सत्यशोधक केशवराव विचारे समग्र वाङ्मय, पद्मगंधा प्रकाशन, पुणे प्र. आ. मार्च २००० पृ. १५५

२०. मुलाखत - विचारे लक्ष्मण केशवराव दि. २४-५-२००२

२१. सत्यशोधक विद्यार्थी संघ कार्यक्रम पत्रिका

२२. फाळके राजाराम बापू - 'केशवराव विचारे गुरुजी जीवन दर्शन' प्रकाशक विचारे रामराव, सातारा रोड प्र. आ. नोव्हेंबर १९८८ पृ.२६-२७

२३. फाळके उत्तमराव - 'रूढीप्रिय समाज रचनेविरूध्द आयुष्यभर लढणारे ज्योत्याजीराव फाळके' सत्यशोधक समाज प्रबोधन पत्रिका १९९० (संपा. गुजर जयवंत)

२४. फाळके राजाराम बापू - 'केशवराव विचारे गुरुजी जीवन दर्शन' प्रकाशक विचारे रामराव, सातारा रोड प्र. आ. नोव्हेंबर १९८८ पृ.२८

२५. फाळके राजाराम बापू - 'केशवराव विचारे गुरुजी जीवन दर्शन' प्रकाशक विचारे रामराव, सातारा रोड प्र. आ. नोव्हेंबर १९८८ पृ. २८

२६. बागल माधवराव खंडेराव (संपा.) - सत्यशोधक हीरक मोहत्सव ग्रंथ, १९३३ प्रकाशक प्रदीप गायकवाड, समता सैनिक दल, नागपूर, पुनर्मुद्रण - २००२ पृ. ७१

२७. कित्ता पृ. ७२-७४

२८. राष्ट्रवीर - बेळगाव, रविवार ३ जुलै, १९२१ पृ. ४

२९. मुलाखत - विचारे लक्ष्मण केशवराव दि. २४-५-२००२

३०. फाळके राजाराम बापू - 'केशवराव विचारे गुरुजी जीवन दर्शन' प्रकाशक विचारे रामराव, सातारा रोड प्र. आ. नोव्हेंबर १९८८ पृ. ३२

३१. गुजर जयवंत (संपा.) अखिल भारतीय सत्यशोधक समाज, २७ वे अधिवेशन, सांगली, सत्यसंशोधन १९९८ पृ. २८-२९

३२. ठोके मो. नी., (संपा.) रा. ना. चव्हाण निवडक वाङःमय, पारख प्रकाशन, बेळगाव प्र. आ. मार्च १९८० पृ. ८२

३३. विचारे केशवराव यांच्या दप्तरातील विवाह विधीच्या नियमांची टंकलिखीत प्रत

३४. मुलाखत - विचारे लक्ष्मण केशवराव दि. २४-५-२००२

३५. मुलाखत - घाटगे पुंडलीक हरी (गुरुजी) दि. ७-७-२००२

३६. मुलाखत - जाधव गोरख दत्ताजीराव दि. ७-११-२००२

३७. मुलाखत - विचारे लक्ष्मण केशवराव दि. २४-५-२००२

३८. मुलाखत - फरांदे प्रकाश पुंडलीक दि. १७-७-२००२

३९. गरूड शांताराम जयराम (संपा.) प्रबोधन प्रकाश ज्योती, जुलै २०००, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, पृ. १०

४०. राष्ट्रवीर - बेळगाव रविवार दि. १७ मार्च १९३६

४१. फाळके राजाराम बापू - यांच्या हस्तलिखित नोंदी - लेख - 'पुज्यनीय गुरुवर्य के. व्ही. विचारे यांची सहकारी क्षेत्रातील ४२ वर्षाची कामगिरी व अनुभव'

४२. जांभूळवाडी इंडस्ट्रियल कॉलनी - माहिती तक्ता

४३. जांभूळवाडी इंडस्ट्रियल कॉलनी - माहिती तक्ता, मुलाखत - विचारे लक्ष्मण (आण्णा) केशव दि. २४-५-२००२

४४. फाळके पाडळी सामुदायिक सहकारी शेती सोसायटी लि. सामान्य माहिती दाखविणारा तक्ता.

४५. ''भक्तवडी सामुदायिक सहकारी शेती सोसायटी लि.'' सामान्य माहितीचा तक्ता

४६. **मुलाखत - घाटगे पुंडलिक हरी (गुरुजी)** दि. ७-७-२००२

४७. मुलाखत - विचारे लक्ष्मण (आण्णा) केशव दि. २४-५-२००२

४८. बागल माधवराव खंडेराव (संपा.) - सत्यशोधक हीरक मोहत्सव ग्रंथ, १९३३ प्रकाशक प्रदीप गायकवाड, समता सैनिक दल, नागपूर, पुनर्मुद्रण - २००२ पृ. १६६

४९. मुलाखत - विचारे लक्ष्मण (आण्णा) केशव दि. २४-५-२००२

५०. ठोके मो. नी., (संपा.) रा. ना. चव्हाण निवडक वाङःमय, पारख प्रकाशन, बेळगाव प्र. आ. मार्च १९८० पृ. १४२

५१. राष्ट्रवीर - बेळगाव दि. १२ जुन १९२१ पृ. ४

५२. मुलाखत - विचारे लक्ष्मणराव केशवराव दि. २४-५-२००२

५३. बागल माधवराव खंडेराव (संपा.) - सत्यशोधक हीरक मोहत्सव ग्रंथ, १९३३ प्रकाशक प्रदीप गायकवाड, समता सैनिक दल, नागपूर, पुनर्मुद्रण - २००२ पृ. १६६

५४. पाटील टी. एस्. कोल्हापूर संस्थानातील सामाजिक, राजकीय चळवळीचा एक अभ्यास (इ. स. १९२२ ते १९४०) अप्रकाशित एम्. फिल्. शोध प्रबंध पृ. १८

५५. कित्ता, पृ. १८

५६. मुंबई पुराभिलेखागार, होम डिपार्टमेंट, फाईल नं. ३६३ - १९३२ पृ. १४१

५७. कित्ता, पृ. १४१

५८. कित्ता, पृ. १४९

५९. कडियाळ आर.ए., कर्मवीर भाऊराव पाटील, स्मृती प्रकाशन, कोल्हापूर, १९९१ पृ. ६९

६०. मुलाखत - घाटगे पुंडलीक हरी - ७/७/२००२

मुलाखत - फाळके राजाराम बापू - ७/१०/२००२

६१. पाटील रा. तु. - क्रांतिसिंह नाना पाटील - एक स्वयंभू ग्रामीण क्रांतिकारक